Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 638 – 641
DOI: 10.5281/zenodo.10279003

Original Research Article

# महात्मा गांधी आणि क्रिकेट

प्रो. डॉ. गोविंद केरबा कलवले

विभाग प्रमुख, क्रीडा विभाग, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय हाडोळती ता. अहमदपूर जि. लातूर ४१३५१४ महाराष्ट्र, भारत

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

एकेकाळी धर्माच्या आधारावर मुंबईत होणारे पंचरंगी सामने बंद पडले ते महात्मा गांधी यांनी आंदोलनाचे हत्यार उभारल्यामुळे. या पंचरंगी सामन्यांच्या इतिश्रीलाही आता ७५ वर्षे होत आहेत.

महात्मा गांधी यांची १५०वी जयंती देशभर साजरी होत असतानाच क्रिकेट या भारतातील सर्वांत लोकप्रिय खेळाचा यंदाच्या मोसमाची नांदी झाली आहे. भारतावरील ब्रिटिश राजवट, परदेशी बनावटीच्या वस्तूंसह देशातून हद्दपार करण्यासाठी आयुष्यभर ज्या महात्मा गांधी यांनी लढा दिला, त्यांचा क्रिकेट या इंग्लंडमधून आयात केलेल्या आणि कानामागून येऊन तिखट झालेल्या खेळाशी काही संबंध असेल अशी सुतराम शक्यता वाटत नाही. पण तरीही तो होता. त्यांच्या शालेय जीवनात प्रत्यक्ष क्रिकेटशी आणि पुढे १९४६ मध्ये त्या खेळातील अफाट लोकप्रिय सामन्यांच्या विरोधात जाऊन ते इतिहासजमा करण्यात महात्माजींचा मोठा वाटा होता.

स्वातंत्र्यपूर्व काळात एक गुलाम राष्ट्र म्हणून परदेशात आपल्या देशाकडे पाहिले जायचे. त्यामुळे त्याकाळी आजच्यासारखे क्रिकेट खेळणारे परदेशी संघ भारतीयांशी खेळण्यास नाराज असत. तरीही भारतात राज्यकर्ते म्हणून स्थायिक झालेले ब्रिटिश आणि ऑस्ट्रेलियासारखे त्यांचे मांडलिक देशातील भारतात वास्तव्यास असलेले सैनिक आणि नोकरशहा विरंगुळ्याचा काळ आपआपसात क्रिकेट खेळण्यात व्यतीत करत. काही काळाने त्यांनी सुखासीन जीवन जगणारे भारतातील संस्थानिकही त्यांच्या खेळात सामील करून घेतले गेले. हे क्रिकेट सामन्यांचे भारतीयांना वेडच लागले.

एव्हाना महानगरात जागोजागी विविध धर्मांचे जिमखाने उभे राहिले आणि इतर खेळांबरोबर जिमखाना सभासदांचा क्रिकेट खेळ रंगत असे. ब्रिटिशांना आपसात खेळण्यातील चुरस कमी झाल्यानंतर त्यांनी या जिमखान्यांच्या संघांविरुद्ध क्रिकेट सामने खेळण्यास प्रारंभ केला. असा पहिला सामना पारशी संघाबरोबर १९३० साली झाला.

कालांतराने याला विशाल स्वरूप आले आणि अशा सामन्यात हिंदू आणि मुस्लिम जिमखान्याचे संघही उतरले. या सामन्यांना चौरंगी क्रिकेट सामने असे संबोधले जाऊ लागले. या चार धर्मियांशिवाय उर्वरित लहान-लहान धर्माच्या क्रिकेटपटूंनाही यात आपलाही सहभाग असावा असे वाटू लागल्यावर त्यांचा 'रेस्ट' (इतर) असा अजून एक संघ त्यात खेळू लागला आणि हे क्रिकेट सामने झाले पंचरंगी क्रिकेट सामने प्रारंभी बोरीबंदरजवळ बॉम्बे जिमखान्यावर होऊ लागले. नंतर हे सामने नव्याने बांधलेल्या ब्रेबॉर्न स्टेडिअममध्ये रंगू लागले. त्यांनी लोकप्रियता मिळविली. विविध धर्मांतील संघामध्ये प्रचंड चुरस निर्माण झाली.

पुढे या सामन्यांमुळे वैरभाव निर्माण झाला आणि याचे प्रतिबिंब उमटू लागले. यातूनच हिंदू आणि मुस्लिम यांच्यात फूट पाडण्याच्या ब्रिटिशांच्या मनसुब्याला खतपाणी मिळाले. काही वेळा मैदानावरील वैराचे जातीय दंगलींमध्ये रूपांतर होत असे. महात्माजी या घडामोडीमुळे व्यथित होत. पण प्रचंड लोकप्रिय झालेल्या या सामन्यांचा अटकाव कसा करावा असा संभ्रमही होता. अखेर एका क्रिकेटप्रेमी स्वातंत्र्यसैनिकाने याला वाचा फोडली.

स्वातंत्र्य दृष्टिपथात आले असता १९४६ मध्ये अशा धार्मिक आधारावर खेळल्या जाणाऱ्या सामन्यांना बंदी घालावी, यासाठी चळवळ सुरू झाली आणि या कार्यकर्त्यांनी महात्माजींचे साह्य मागितले. बापूंना दोन धर्मियांमध्ये फूट पाडणारे हे सामने खटकत होतेच. त्यांनी त्या चळवळीला सक्रिय पाठिंबा दिला नसता तर नवल. अखेर १९४६च्या पंचरंगी सामन्यानंतर ते कायमचे इतिहासजमा झाले. तरीही क्रिकेट रसिकांमध्ये त्या लोकप्रिय सामन्यांच्या स्मृती अनेक वर्षे रेंगाळत राहिल्या.

शेवटच्या पंचरंगी सामन्यांच्या साखळीमध्ये हिंदू संघाने मुस्लिम संघावर मात केली होती. त्या हिंदू संघामध्ये विजय मर्चंट, उदय मर्चंट, प्रो. दि. ब. देवधर, लाला अमरनाथ, अमरसिंग, सी. एस्. नायडू, यष्टीरक्षक हिंदळेकर हे दिग्गज क्रिकेटपटू खेळल्याचे आठवतात. तर विरोधी मुस्लिम संघातून अब्दुल हफीज कारदार (हा पुढे पाकिस्तानचा कर्णधार झाला). पाकिस्तानचा पहिला कर्णधार मुश्ताक अली, अमिर इलाही, विकेटकीपर ई. एस्. माका हे खेळले होते. साखळीतच बाद झालेल्या युरोपियन संघात डेनिस कॉम्टन हे एक नाव आठवते. हाच पुढे इंग्लंडच्या फुटबॉल संघातही खेळत असे. टोमॅटोसारख्या लाल गालांचा गब्दुल कॉम्टन चाहत्यांच्या स्मृतीत चपखल बसला. त्यांच्याविरुद्धच्या पारशी संघात रुसी मोदी, पॉली उम्रीगर, रुसी सुरती, पी. के. तारापोर असे दिग्गज क्रिकेटपटू होते. तर पाचव्या रेस्ट या संघात विजय हजारे, विवेक हजारे हे ख्रिश्चनधर्मीय खेळल्याचे आठवते. हे दोघे बंधू पुढे बडोदे संघाकडून खेळत राहिले.

चौरंगी-पंचरंगी सामने आता इतिहासजमा झाले असले तरी त्यातील अनेक गमतीजमतींना आणि त्याकाळच्या प्रेक्षकांच्या खिलाडूवृत्तीलाही क्रिकेटरसिक मुकले हे तितकेच खरे. बॉम्बे जिमखान्यावर खेळल्या गेलेल्या अखेरच्या चौरंगी सामन्यासंबंधी जुने बुजुर्ग अशी आठवण सांगत की हिंदू संघाकडून खेळणारे धिप्पाड क्रिकेटपटू सी. के. नायडू हे षटकार मारण्यात पटाईत होते. त्यांचे अनेक षटकार क्रॉस मैदान ओलांडून चर्चगेट स्थानकात विसावले होते, पण त्यांची एक

सिक्सर इतकी प्रचंड लांब गेली की तो चेंडू राजाबाई टॉवरच्या घड्याळाला धडकून खाली घरंगळला. यात अतिशयोक्ती वाटली तरी त्यावेळचे क्रिकेटही असे ठोकाठोकीचे होते. आजच्या २०/२० सारखेच.

पंचरंगी सामने ब्रेबॉर्न स्टेडिअमवर स्थलांतरित झाले, तेव्हा तेथील केवळ सिमेंटच्या पायऱ्या असलेल्या ईस्ट स्टँडमध्ये बसलेले प्रेक्षक जाणकार तर असतच पण खिलाडूवृत्तीने एकमेकांची टर उडवितही सामन्यांचा आनंद लुटत असत. अशा एक पंचरंगी सामन्यात हिंदूतर्फे प्रो. देवधर फलंदाजीला आले, तेव्हा विरोधी पारशी संघाच्या पाठीराखाने 'ए भाऊ, हा वरणभात खाणारा क्रिकेटर आमच्या गोलंदाजापुढे काय टिकणार?' असा टोमणा मारला. त्याला एका हिंदू पाठीराख्याने सणसणीत जवाब दिला, 'ए, हे पुण्याच्या मुळामुठेचे पाणी आहे, मुंबईसारखे तानसाचे मचूळ नाही' हा पुकार संपता संपता देवधरांनी एक सणसणीत चौकार ठोकला आणि टाळयांच्या गजरात ती शाब्दिक चकमक थंडावली. पारशी प्रेक्षक हिंदू पाठिराख्यांना 'ए तात्या' असे संबोधत. त्याला उत्तर यायचे, 'जा रे, सरशी तेथे पारशी, पण आता पडशील तोंडघशी.' असे येई.

डिजिटलायझेशन न झालेल्या त्या काळात स्टेडिअममध्ये फक्त एक स्कोअरबोर्ड प्रेस गॅलरीचा वरती उभा होता. त्यावर दर दहा धावांनी धावा वाढविल्या जायच्या. प्रेसबॉक्समधील मुख्य स्कोअरने घंटा वाजविली की स्कोअरबोर्डावर दहा धावा वाढविल्या जात. शेजारच्या ईस्ट स्टँडमधील प्रेक्षकही इतके जाणकार की ती संकेत घंटा वाजली की टाळयांचा गजर सुरू करीत. क्रिकेटर विजय मर्चंट तेव्हा सोलो हॅट डोक्यावर घालून फलंदाजी करत. ती एखाद्या घमेल्यासारखी असे. हेल्मेट तर माहीतही नव्हते. काऊंटी कॅंपही आली नव्हती. मुस्लिम संघातील एका तेज गोलंदाजाचा चेंडू त्यांच्या सोला हॅटवर आदळला आणि ते पटकन खाली बसले. मुस्लिम संघ समर्थकांमध्ये जल्लोष सुरू झाला. बराच वेळ बाद न होणारे मर्चंट आत 'रिटायर्ड हर्ट' म्हणून पॅव्हेलियनमध्ये परतणार या अपेक्षेने ते प्रेक्षक खूष होते. पण कणखर विजयभाई डोळे चोळीत उठले आणि त्यांनी फलंदाजी सुरू करून शतक झळकावले आणि आता हिंदू पाठीराख्यांचा जल्लोष होऊ लागला. अशी परस्परांवर जल्लोषांची कुरघोडी करण्याची चढाओढ लागत असे. सामन्यात जल्लोष-प्रती जल्लोष होतच असे. तरीही घरी परतताना प्रेक्षक एकमेकांशी हस्तांदोलन करून परतत असत. एका सामन्यानंतर मात्र चिडीने एका जमातीच्या मोहल्यात दंगल उसळली आणि तीच या लोकप्रिय सामन्यांच्या इतिश्रीडे वाटचाल होती. गांधीजींना नेमके खटकत होते ते हेच आणि त्यामुळेच त्यांनी या पंचरंगी सामन्यांच्या विरोधात आंदोलनास पाठिंबा दिला.

हे पंचरंगी क्रिकेट सामने इतिहासजमा झाल्याला आज ७५ वर्षे झाली आहेत!

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. बोंडुरेंट, जोन. *हिंसा पर विजय: संघर्ष का गांधीवादी दर्शन*. रेव. संस्करण, बर्कले: कॅलिफोर्निया विद्यापीठ प्रेस, 1971.

२. बोर्मन, विलियम। *गांधी आणि अहिंसा*. न्यूयॉर्क: स्टेट यूनिवर्सिटी ऑफ़ न्यूयॉर्क प्रेस, 1986.

३. चटर्जी, मार्गरेट. *गांधीजी के धार्मिक विचार*. नोट्रे डेम विद्यापीठ प्रेस, 1983.

४. डाल्टन, डेनिस. *महात्मा गांधी: क्रिया में अहिंसक शक्ती*। न्यूयोर्क: कोलंबिया युनिवर्सिटी प्रेस, 1993.

५. धवन, गोपीनाथ. *महात्मा गांधी का राजकीय दर्शन*. बम्बई, 1946; पुनर्मुद्रण, दिल्ली, १९९०.

६. फॉक्स, रिचर्ड. *गांधीवादी यूटोपिया: संस्कृतीची साथ वापर*. बोस्टन: बीकन प्रेस, 1989.

७. ग्रीन, मार्टिन. *महात्मांचा आक्षेप*. न्यूयोर्क: बेसिक बुक्स, 1978